**बाल विवाह निर्मूलन पथनाट्य - थांबवा बालविवाह थांबवा!!!**

ऐका हो ऐका.. भाऊ-ताई, काका-काकी, मामा-मामी, आत्या मावशी लक्ष देवून ऐका.. विषय आहे मोलाचा तुमच्या आमच्या प्रगतीचा.. आपल्या समोर सादर करीत आहे एसबसी३, यूनिसेफ, जिल्हा प्रशासन व नेहरू युवा केंद्र **थांबवा बालविवाह थांबवा!!!**

डम डम डमाक.. डम डम डमाक.. डम डम डमाक.. डम डम डमाक
मेहरबान.. साहेबान.. कदरदान..
होशीयार, आपल्या नगरचे मंत्री आणि सचिव येत आहेत हो.. डम डम डमाक.. डम डम डमाक..

मंत्री- सचिव आपल्या भागातले हाल हवाल काय आहेत.

सचिव- आपल्या भागात बाल विवाह ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे मंत्री... बालविवाह

मंत्री- यात काय गंभीर आहे... विवाह तर होतच असतात ते बाल वयात झाले काय आणि तरुण वयात झाले काय..

सचिव- बालविवाह ही खूपच गंभीर समस्या आहे मंत्री.. चला तुम्हाला दाखवतो...

मंत्री- चला तर मग

**एक दोन तीन चार**
**बालविवाह बंदीचा करू प्रचार**

---

**प्रसंग – १**

**गाण: भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी अर्ध्यावरती डाव मोडला आधुरी एक कहाणी..**

(अंगणात मुलगा – मुलगी भातुकलीचा खेळ खेळत आहेत त्याचाच बाजूला बबनराव व सुभानराव)

बबनराव- सुभानराव पोरगा पोरगी भातुकली खेळतायत

सुभानराव- होय की, पोर हाय भातुकली खेळणारच

बबनराव- सुभानराव पोरगा पोरगी भातुकली खेळतायत

सुभानराव- होय की, पोर हाय भातुकली खेळणारच

बबनराव- तस नाय, सुभानराव पोरगा पोरगी भातुकली खेळतात

सुभानराव- होय की, पोर हाय भातुकली खेळणारच

बबनराव- सुभानराव पोर-पोरी..

सुभानराव- आता काय.. १०० रु च्या बॉन्डवर लिहून देऊ का.. पोर हाय खेळणारच म्हणून

बबनराव- अव म्हणजे पोरापोरीचा भातुकलीचा खेळ मोठेपणी खरा व्हावा म्हणतो मी.. आमच्या पोरासाठी तुमची पोरगी मागतुया..

सुभानराव- तुमचा शब्द खाली जाऊ देणार व्हय मी.. दिली म्हणून समजा

निवेदक- रूढी, परंपरेनुसार चालत आलेल्या शब्दासाठी आणि मैत्रीसाठी आपल्या मुलामुलींच लग्न बालवयात ठरवतात. मुलीच्या शिक्षणाचा, सुरक्षेततेचा, विकासाचा व सहभागाचा विचार न करता थेट लग्नाचा विचार करणे हे समाजात सहजतेने दिसते. ही

एक सामाजिक कुप्रथा नाही का? आजही महाराष्ट्रात १०० विवाह पैकी ४० बालविवाह होतात. हे थांबणे गरजेचे नाही का? समाज चालतो म्हणून चलविण्यापेक्षा; तो बदलतो म्हणून बदलणे गरजचे नाही का?

**पाच सहा सात आठ**
**बाल विवाह प्रथेची लावू वाट**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**प्रसंग – २**

गाण: मे क्या करू राम मुझे बुढा मिल गया

मे क्या करू राम मुझे बुढा मिल गया

घरातील सीन

*आई वडील नवऱ्या मुलास नवरी दाखवतात*

मध्यस्थी (नवऱ्या मुलास)- मुलगी पसंद आहे का?

नवरा मुलगा (लाजत): हो पसंद आहे.. मुलगी सुंदर आहे

मध्यस्थी - (मुलीच्या वडिलास) हे बघा मुलगी मुलास पसंद आली आहे. आता फक्त मुहूर्त पहा..

वडील- पण आमची मुलगी सोळा वर्षांचीच आहे आणि नवरा मुलगा ३५ वर्षाचा आहे. दुप्पट वय आहे मुलाचे.

मध्यस्थी- मुलगा खूप हुशार आहे. शिक्षणात अनेक वर्षे घातले त्याने, आता नौकरीवर आहे. तुम्हाला असा नौकरीवाला जावई मिळेल का? कोरोनाने सांगितले काळ वाईट आहे उद्याचा काही भरोसा नाय बापा..

वडील- ते तर बरोबरच आहे. (बायकोला) अग इकडे ये.. मुलाला मुलगी पसंद आली आहे..

आई- पण लग्नासाठी आपल्याकडे काहीच पैसे शिल्लक नाहीत

मुलाचे वडील- तुम्ही लग्नाचे टेंशन घेऊ नका... लग्नाचा खर्च आम्ही करतो, आम्हाला हुंडा नको.. फक्त मुलाला आणि मुलीला दागिने द्या फक्त..

मुलीची आई- चालेल सावकार कडून थोडे कर्ज काढू.. मुलीची आयुष्याभराची गरीबी तरी जाईल... पहा मुहूर्त.. अजून दोन मुली आहेत..

निवेदक: मित्रानो, घरची गरीबी, पैशाच आमिष व मध्यस्थी व्यक्तीच्या पुढाकारमुळे आई वडील लग्नासाठी तयार झाले आहेत. नवरा वयाने खूपच मोठा असेल किंवा श्रीमंत असेल तर लग्नाच्या नावाखाली मुलीला विकत घेतले जाते. उस तोडणीसाठी कोयते (जोडी) पूर्ण करण्यासाठी बालविवाह सहज केले जातात. बालविवाहमुळे मुलीची मानसिक, शारीरिक व भावनात्मक वाढ झालेली नसते. महाराष्ट्रात बालविवाहाचे ४० टक्के प्रमाण आहे. तर १८-१९ वर्षात माता होण्याचे प्रमाण ६० टक्के आहे. यामुळे गर्भपात, कुपोषित बाळ, माता मृत्यू, हिमोग्लोबीनचे कमी प्रमाण, अर्भक मृत्यू अश्या अनेक समस्या निर्माण होतात. ज्या की विकासासाठी बाधा ठरतात.

**नऊ दहा अकरा बारा**
**बालविवाह समूळ नष्ट करा..**

सचिव : मंत्री महोदय, पाहिलत सचिव बालविवाह केवठी मोठी समस्या आहे ते

मंत्री : हो तर आताच कळल बालविवाह ही एक मोठी समस्या आहे आणि आपल्या कार्यक्षेत्रात आहे. कसे थांबविता येईल बर

सचिव: महोदय, बालविवाह हा कायद्याने गुन्हा आहे व ज्यानी तो घडवून आणला आहे किंवा सहकार्य केले आहे ते सर्वजण शिक्षेस पात्र आहेत. जसे की, लग्न लावणारा, आचारी, फोटोग्राफर, डिजे वाला, मंडपवाला एवढंच नाही तर वऱ्हाडी मंडळीवर देखील गुन्हा दाखल होतो. २ वर्षे कारावास किंवा १,००,००० पर्यन्त दंड भरावा लागतो.

मंत्री: मग तर मस्तच आहे. ज्या मुलीचे १८ वर्षे पूर्ण आहे आणि मुलांचे २१ वर्ष पूर्ण आहे अश्याच लग्नात सर्वानी सहकार्य करावे. अन्यथा  १०९८ वर संपर्क करून बालविवाहाची माहिती द्यावी.

सचिव: हो नक्कीच १०९८ हा टोल फ्री क्रमांक आहे. तसेच येथे कुणी ही बाल विवाहाची माहिती देऊ शकतो. जसे की, तुम्ही, मी, अंगणवाडी ताई, पोलिस पाटील किंवा इतर कुणीही.. आणि हो.. माहिती देणाऱ्याचे नाव १०० टक्के गोपनीय ठेवले जाते. प्रत्येक गावात बाल संरक्षण समिती असते. अंगणवाडी सेविका सचिव तर सरपंच हा अध्यक्ष असतो.

मंत्री: अगदी खर आहे.. कोण कोण बालविवाह निर्मूलनासाठी पुढाकार घेणार.. तुम्ही घेणार का? आणि तुम्ही? आणि तुम्ही? मग करा की हात वर..

**बालविवाहा विरुद्ध जनजागृती करूया..**
**भारताच्या प्रगतीचा ध्यास धरूया ..**

---------------------------------------------------------------------------------------------------------------